# सहाआसनी रिक्षावर बंदी

कोठल्याही समस्येवर उत्तर शोधताना ग्राहक किंवा जनता राजा समजून समस्येची उकल करावी. असित्वात असलेली प्रणाली बदलताना ती प्रणाली अस्तित्वात कशी आली याचा शोध घेणे अनिवार्य आहे. प्रणाली बनवण्याला जबाबदार असणाऱ्या संबधिताना त्यांचे मत अजमावे. त्यानी चूक केली असेल तर त्याना जबाबदार धरून त्याबद्दल त्याना शिक्षा करावी व नंतरच त्यामध्ये बदल घडवावेत.

शहरातील वाहतूक समस्या नवीन नाही. जसे दिवस जातात तशी ती भयानक होत आहे. ह्या समस्येवर कांही वर्षापूर्वी उपाय काढला सहाआसनी रिक्षांचा. लोकाना सहाआसनी रिक्षा आवडल्या. भरपूर लोकाश्रय मिळाला. रिक्षामालक, रिक्षा चालक व जनता सर्वच खूष झाले. त्यामध्ये कांही त्रुटी आहेत. त्यावर जरूर उपाय शोधावे लागतील. प्रदूषण कमी करणे अति आवश्यक आहे. चालकाना शिस्त लावलीच पाहिजे. रिक्षा बस स्थानकापासून दूर थांबवाव्यात. रस्त्याच्या मधे प्रवाशाने हात दाखवला थांबू नये. रिक्षा एका बाजूला घेऊन थांबावे. वस, ट्रक, कार वगैरेना ओव्हरटेक करू नये. चौकात डाव्या बाजूने जाणाऱ्या वाहनाकरता रस्ता मोकळा ठेवावा. या बद्दल नक्कीच सुधारणा झाली पाहिजे. परंतु, रिक्षावर बंदी घालणे हा यावर उपाय नव्हे.

रिक्षावर बंदी घालण्या करता या पैकी एकही कारण दिले नाही. शहर बस तोट्यात का? तर सहाआसनी रिक्षा मुळे प्रवासी बस ऐवजी सहाआसनी रिक्षा पसंत करतात म्हणून. जनतेच्या मताला कांहीच किमत नाही काय? बस कोणाकरता? जनतेकरता का बसच्या वाहक, चालक, अधिकरी, नगरसेवकाकरता? जनतेने दरवर्षी होणारा तोटा का सहन करावा? वाहक, चालकांची अरेरावी का खपवून घ्यावी? जर जनतेकरता स्वस्त व प्रशाशनाकरता फायदेशीर व्यवस्था शक्य नसेल तर मृताला पाणी पाजून उठवण्याचा प्रयत्न जनतेच्या पैशावर का करू द्यावा?

मुंबई सारखी लोकल ट्रेनची व्यवस्था पुणे-पिंपरी-चिंचवड जोड शहराकरता शक्य नाही काय? आकुर्डी लोणी दरम्यान दर १०/१५ मिनटाला लोकल सेवा देता येणार नाही काय? जरूर शक्य आहे. आकुर्डी लोणी दरम्यान नवीन दुहेरी मार्ग टाकावा. जागेचा प्रश्न जरूर आहे. पण त्यावर उपायही आहे. शहराच्या बाहेरून नवीन मार्ग बनवणे शक्य आहे. सर्व रेल्वे गाड्या आकुर्डी व लोणी येथे थांबवाव्यात. प्रवाशानी तेथे उतरून लोकलने पुढे जावे. थोडा त्रास होईल पण तो अंगवळणी पडायला फार दिवस लागणार नाहीत. कांही प्राप्त करण्याला त्याग आवश्यक आहे.

बस व्यवस्थापनाने आपले घर शाकारावे. दुसऱ्याच्या घरावरील कौले आपल्या घरावर घालण्याचा आग्रह धरू नये. सार्वजनिक जावन जगणाऱ्यानी जनतेचे हित पाहावे. बाकी सर्वांची हिते गौण समजावीत. रेल्वे वाहतुकीला प्राधान्य द्यावे. काय? जनतेने ही अपेक्षा करावी काय?